झाले व त्यांनीं आपला हात पुढे केला. महाराजांनीं त्याचें मनगट त्या नागिणीच्या तोंडात दिले व ती चावल्यावर रक्तप्रवाह सुरू झाला, व त्या रक्तावर पिवळसर रंगाचें त्या नागिणीचे विष दिसूं लागले. महाराज स्वसामर्थ्यानें सर्पाला निर्विष करीत नाहींत, परंतु विष रक्तांत मिसळूं देत नाहींत, त्यामुळे रुधिराभिसरणाबरोबर त्याचा शरीरात प्रवेश न झाल्यामुळे तें विष बाधत नाहीं.

सर्पाबद्दल साधारण प्रचलित समज असा आहे कीं, त्याचा विषारी दांत टाळूंत असतो व सर्प प्रथम साध्या दांतानें चावून नंतर उलटा होतो व टाळूचा विषारी दात तेथे लावतो. परंतु हा समज भ्रामक आहे हे महाराजांनीं प्रत्यक्ष प्रयोगानें सिद्ध केले. चावल्यावर सर्प उलटा होतो ही गोष्ट खरी, परंतु ते उलटे होणें टाळूचा विषारी दांत लावण्याकरितां नसून त्याचे विषारी दांत चिंचेच्या आंकड्यासारख्या आकाराचे असतात पण ते नाजुक असल्यामुळे ते त्वचेतून बाहेर काढून घेण्याकरितां तो उलटा होतो.

सर्पासंबंधीं महाराजांनीं जरी इतकी सप्रयोग माहिती दिली तरी मंडळींत कांक्षाखोर काहीं होतेच व तसे असणें स्वाभाविक आहे. विषारी सर्प चावून विषार न बाधणें ही अलौकिक शक्ती महाराजांचे ठायीं वसत असली तरी ही गोष्ट निसर्गाच्या विरुद्ध आहे, याबद्दल वाद नाहीं. महाराजांनीं बरोबर आणलेले सर्प निर्विष केलेले असतील, अशी शंका येणें साहजिक आहे. या कांक्षाखोर मंडळीचे समाधान करण्याचे महाराजांनीं मनावर घेतलें. एखादा नवा विषारी सर्प धरून आणण्यास त्यांनीं आपल्या मनुष्याला सांगितलें व तो त्याचे विषारी दांत काढणार नाहीं, या बद्दलची खात्री करून घेण्याकरिता कांहीं इतर माणसें त्याचेबरोबर पाठविलीं. शिर्डीस सर्पांना तोटा नाहीं. पाणवठ्याचे आसपास सर्प असतात, थोडा तपास केल्यावर एक सर्प सांपडला तो धरून महाराजांचेपाशीं आणला. आग्यापरळ नांवाची एक जात आहे, त्या जातीचा तो सर्प होता. शिर्डीस आलेल्या पाहुणे मंडळींत एक पुण्याच्या कॉलेजमधील प्राणिशास्त्राचें (Zoology) शिक्षण घेतलेले तज्ज्ञ होते, त्यांनीं तो सर्प पाहून तो विषारी म्हणजे चावल्यापासून ६ तासानें मृत्यु येणाऱ्या जातीपैकीं आहे व त्याचे

विलीं. संध्याकाळचे सुमारास सर्व लांकडे जळून रसरशीत निखारे तयार झाले. ज्या कोणास निखाऱ्यावरून चालत जाणें असेल त्याने स्नान करून शुचिर्भूत झाले पाहिजे, अशी महाराजानी आज्ञा केली होती. त्याप्रमाणे १२।१५ मंडळी तयार झाली. जळत्या लांकडांच्या ज्वाला साफ नाहींशा होऊन लाल रसरशीत निखारे झाल्यावर चराच्या दोन्हीं बाजूला उभे राहून त्याची मंडळी चौपदरी धोतरानें निखाऱ्यावर जमणारी रक्षा उडवीत होती, त्यामुळे तो सात हात लांब चर इतका प्रफुल्लित झाला कीं, त्यावर नजर ठरत नव्हती. प्रयोग पाहाण्याकरिता आम्हीं सुमारें ६ फूट लांब होतो तरी तेथेंही आम्हाला अग्नीची धग सहन होत नव्हती. महाराजांनीं प्रथम अग्निनारायणाची पूजा केली, व त्याच्या दैवताचे पुजारी वे. शा. सं. भाऊदेव यांना हातीं धरून अग्नीवरून आहाळातून सावकाश चालत नेले. नंतर जाऊं इच्छिणाऱ्या मंडळीस जाण्यास सांगितले. त्याप्रमाणें सुमारें १०।११ माणसें आहाळांतून बिनधोक चालत गेलीं, त्यात तीन ९।१० वर्षांचीं मुलेंही होतीं. त्यापैकीं फक्त एका इसमाच्या पायाने एक निखारा आहाळाबाहेर उडाला व त्यावर त्याचा पाय पडून त्या ठिकाणीं त्याला भाजले. बाकी कोणाला कांहीं इजा झाली नाहीं. स्नान करून ज्यास्ती मंडळी तयार झाली होती परंतु त्यापैकीं कांहीं तो अग्नीचा देखावा पाहिल्यावर, चालून जाण्यास धजले नाहींत. एका टोंकापासून दुसऱ्या टोकाला जाईपर्यंत ५ ते ६ पाऊलें पडत होतीं. आम्हांला ६ फूटाच्या अंतरावर अग्नीची धग असह्य होत होती म्हणून अग्नींतून चालून गेलेल्या मंडळींना ती धग कशी सहन झाली ते आम्हीं विचारलें. तेव्हां त्यांनीं सांगितले कीं, पायापासून कमरेपर्यंत उष्णता मुळींच वाटत नव्हती, मात्र कमरेवरच्या भागाला धग चांगलीच जाणवत होती. महाराजांनीं दाखविलेला हा चमत्कार पाहून सर्वांना फारच आश्चर्य वाटले. या अंकात "आहाडा"चे घेतलेलें छायाचित्र दिलें आहे.

संध्याकाळीं हा समारंभ झाल्यावर रात्रौ बुवांचें प्रसिद्ध हरिभक्त लाखा कोल्हाटी यांच्या चरित्रावर रसाळ कीर्तन झालें हें आख्यान फार मोठें असल्यामुळे, दोन हप्त्यानें ते पुरे झाले. पुढील अंकांत हें आख्यान देऊं.



" आहाड " ( छायाचित्र )

अखंड सहजानंदा विसरुनि विषयांवरि मन जातें ।
विषयानंदीं तदंश लाभे हे समजीस न येते ॥ ६ ॥

सहजानंदाची महती ती तो गेल्याविण नुमजे ।
जैसें मरुदेशीं जे जावें तैं तोयाची उमजे ॥ ७ ॥

वृश्चिकदंशें विव्हळ जाता स्वानंदचि मग कोठें ।
विषयीं सुखदायकता नसते तत्त्व असें हे मोठें ॥ ८ ॥

साखर निजगुण दावि सदोदित तैसें विषयीं असते ।
गुणरूपें सुख तरि विषयांना न कदा कोणी त्यजितें ॥ ९ ॥

सहजानंदा जीवा हृदयीं स्थानचि नसेल जेव्हां ।
स्वर्गीयहि ते विषय गमति कीं विषवत्त्याज्यचि तेव्हां ॥ १० ॥

विभक्त सच्चिन्मय आनंदापासुनि हृदयस्थाच्या ।
होता जीवा सुखलाभाच्या गोष्टी मग त्या कैच्या ॥ ११ ॥

विषयीं भासे सुखबिंदू जो उगम तयाचा आहे ।
सहजानंदीं तो सिंधू रे विचार करुनी पाहे ॥ १२ ॥

विषयीं सुखसामग्री असतो तरि कां तरतमभावें ।
सुख न मिळावें तिजपासुनि रे ते कांहीं उमजावें ॥ १३ ॥

कुरूप निजपति गुणहीनहि जरि निःसीमचि तो होये ।
तरी सतीतें तत्संगाविण भास सुखाचा नोहे ॥ १४ ॥

सच्छीलाते तैशी सुखदा एक निजस्त्री वाटे ।
गुणहीनहि जरि असली ती तरि परांगने नच भेटे ॥ १५ ॥

स्वपतीवांचुनि भोगेच्छा ती नान्यीं होतचि सतितें ।
रूपगुणास्तव कधीं न पाही सुस्त्री परपुरुषातें ॥ १६ ॥

जारिणि आणिक जार प्रहातां रूपगुणावरि कांहीं ।
प्रेम तयाचें अवलंबुनि तें प्रायः राहत नाहीं ॥ १७ ॥

विषयीं सुख जरि असते तरि मग उत्तम साधन त्याज्य ।
कैसे होइल न घेइ ला जया मिळतसे आज्य ॥ १८ ॥

तेविं कृपण तो स्वद्रव्याचा कदापि भोग न घेई ।
तथापि नुसते पाहुनि त्याते आनंदी तो राही ॥ १९ ॥

जड विषयामधिं आनंदाचें देणेंघेणें कैचें ।
सुबुद्ध जीवालाही कीं हो प्रायः नुमजे ऐसे ॥ २० ॥

सुख विषयींचे ऐसें आहे सकलचि कल्पित नान्य ।
ऐसे उमजुनि विषयत्यागें जीवे व्हावे धन्य ॥ २१ ॥

अचिंत्य विश्वाभासा पाहुनि हरिच्या ऐश्वर्याची ।
पूर्ण प्रतीति घेउनि मग ती कांस धरावी त्याची ॥ २२ ॥

हरिच्या मायाशक्तीचा उपयोग इतर तो नाहीं ।
हरितें हृदयीं दृढ धरिल्यावरि मग ती त्याज्यचि होई ॥ २३ ॥

जीवा [illegible] अखड आहे सहजानंद तयाला ।
भौतिक विषयाच्या अभिलाषें जीवचि नेइ लयाला ॥ २४ ॥

केवळ हरिभक्तीच्या योगें लाभे सहजानंद ।
आणि मनोनाश होउनी हो तुटतो मायाबंध ॥ २५ ॥

साईरूपे अनन्यभावें हरि निजहृदयीं मान्य ।
वसतो त्याच्या दृढयोगानें रामय्या हा धन्य ॥ २६ ॥

## सच्चिन्मयानंद

(साकी)

आनदाचा विचार झाला आता सच्चिन्मयता ।
कैशी आहे विवेक त्याचा करितों पुढतीं पुरता ॥ १ ॥

सकल जिवाच्या ठायीं नित्यचि चिदात्मता ती वसते ।
जाग्रत्स्वप्नीं मनीं दिसतसे सुषुप्तिमाजिंहि असते ॥ २ ॥

चिच्छक्तीला ज्ञान आपुलें म्हणतां दोषचि येई ।
स्वस्कधावार आरोहण तें संभाव्य कसे होई ॥ ३ ॥

निजप्रकाशे सुपुप्तिअंतीं जाणतसे मन सुख ते ।
आत्मस्वरूपमय होउनि जें सुषुप्तिकाळीं असते ॥ ४ ॥

तिन्ही अवस्थामाजीं ऐशी चिच्छक्ती ती वसते ।
मनयोगें ती निजप्रभावा प्रकट करूनी असते ॥ ५ ॥

चिच्छक्ती ती तिन्ही अवस्थामाजीं आहे ऐसे ।
म्हणतां तिजला सत्ता नाहीं ऐसें होईल कैसें ॥ ६ ॥

भौतिक जड जें तें निजरूपें चंचल सततचि आहे ।
परि विश्वीं ह्या नाश समूळचि कधीं कशाचा नोहे ॥ ७ ॥

चंचल जड जे तेहि जगीं ह्या जरि सत्तात्मक आहे ।
सर्व व्यापक चिच्छक्ती जी ती मग कैशी नोहे ॥ ८ ॥

भिन्न उपाधी जरि जीवाच्या तरि चिच्छक्ती नोहे ।
उपाधिभेदे भिन्न कदा तो आनंदात्मक राहे ॥ ९ ॥

रक्तादिक हीं शरीरभेदें नरासि जेविं न भिन्न ।
सर्व शरीरीं तैशी राहे चिच्छक्तीहि अभिन्न ॥ १० ॥

गोमाता त्या असंख्य असती दुग्ध तयांचे पाही ।
भिन्न नसे त्यापरि चिच्छक्तिहि सदा अभिन्नचि राही ॥ ११ ॥

ईशाच्या इच्छाशक्तीनें चक्र जगाचे चाले ।
तैसे जीवाच्याहि मनाने त्याचें शरीर हाले ॥ १२ ॥

समष्टिचालक ईश असे तो व्यष्टी चालक जीव ।
तत्त्व पहाता एकात्मक ते उमजावा हा भाव ॥ १३ ॥

नामें रूपें चंचल नश्वर वास्तव मिथ्या असती ।
त्यांच्या ठायीं जडात्मतेविण कांहींही गुण नसती ॥ १४ ॥

नामे रूपे न ईश्वरीं तीं तैशीं जीवीं नाहीं ।
आद्यस्वरूप दोघांठायीं एकचि वसते पाही ॥ १५ ॥

हृदयींचा हरि जाता मग ती उरते ओली माती ।
तो गेल्यावरि ह्या देहाला कदापि कोणि न पुसती ॥ १६ ॥

निज रूपाचा बोध नसे त्या ईशस्वरूप कैसे ।
उमजावे परि अज्ञान्याते उमजत नाहीं ऐसें ॥ १७ ॥

आद्यस्वरूप जड विश्वाचे हरिभक्तींतचि नसते ।
तरि हरिनें ह्या स्वशक्तिबाह्या कसे बनविलें असते ॥ १८ ॥

आद्यस्वरूप विश्वाचे ह्या सच्चिन्मय हो आहे ।
त्यामाजीं जड किमपिहि नोहे ऐसे उमजुनि पाहे ॥ १९ ॥

हरि जड नाहीं ऐसे म्हणता तच्छक्तिहि जड नाहीं ।
ऐसे सहज न्याये ठरते त्याला उपाय नाहीं ॥ २० ॥

ईशाची जी मायाशक्ती ती आधीन तयाच्या ।
तैसें आत्मज्ञाने मनही आधिन होय जिवाच्या ॥ २१ ॥

इंद्रियगण तो प्राण तशी तनु मायामय हीं सारीं ।
तीं मनराजा मोहुनि नेती अज्ञानाच्या द्वारीं ॥ २२ ॥

ह्यांच्यासंगें सर्वात्मकता मनासि सोडुनि जाई ।
तदनंतर तो भाव "अहं" त्या सदाचि घेरुनि राही ॥ २३ ॥

सत्याभिमान सोडुनि मन रे मिथ्याभिमान धरिसी ।
त्याच्या योगें सद्वा चिद्वा उभय विनाशा वरिसी ॥ २४ ॥

उत्पत्तिस्थितिलयासि पावे ईशाची ती माया ।
तेविं मनातें देहांतर तें लाभतसे हो राया ॥ २५ ॥

सूक्ष्मत्वे मन अति निर्मल ते त्याविण दुसरी सारीं ।
निजप्रकाशाच्या ग्रहणाला अपात्र असती भारी ॥ २६ ॥

निजात्मरूपीं विलीन होउनि जै तूं तन्मन होसी ।
तैचि मना रे जडता त्यागें चिद्रूपा तूं मिळसी ॥ २७ ॥

तन्मात्रें इंद्रियें गुणात्मक मायोद्भव रे सारीं ।
त्याचीं कर्में त्रिगुणीं ठेवुनि राहे ईशद्वारीं ॥ २८ ॥

विश्वात्मा जो जीवात्म्याचें तात्त्विक स्वरूप आहे ।
त्याला सोडुनि रे मन तुजला जडीं रति कां साहे ॥ २९ ॥

मुक्त सदा जो ईश असे तो पुरुषोत्तम हा भावें ।
वसे सदा जीवांच्या हृदयीं त्यासि कसें विसरावें ॥ ३० ॥

इंद्रिय संघा ईशगुणांच्या अनुरोधानें ठेवीं ।
समता आणिक दया तयाची सर्वांभूतीं दावी ॥ ३१ ॥

सत्ता विश्वीं सार्वत्रिक ती चिदात्मता ती जीवीं ।
आनंदात्मक योगी असतो हें उमजुनि बा ठेवी ॥ ३२ ॥

विषयेंद्रियसंयोगें भ्रमसी तेणें कष्टी होसी ।
त्या संगाचा त्याग करिसि तरी सदा सुखी तूं असती ॥ ३३ ॥

सच्चित्स्वानंदात्मक ठेवा तुझिया समीप आहे ।
विषयेंद्रियसंयोगासंगें नाससि तूं बा पाहें ॥ ३४ ॥

निरहंकारें घडो स्वकार्यचि ईशार्पण हा भावें ।
तेणें ईश्वर तुष्टी लाभे ऐसें बा उमजावें ॥ ३५ ॥

“ अहं ” तसें “ मम ” अखिलचि जाणें अति दुर्घट बा आहे ।
परि तीं गेल्यावीण कदापिहि ईशप्राप्ती नोहे ॥ ३६ ॥

साइकृपा स्फूर्तीनें हृदयीं विचार जें हें आलें ।
तें सारें हो त्यासचि अर्पुनि रामय्या हा बोलें ॥
जय साईनाथा ॥ सोडवि माझें मन आतां ॥ ३७ ॥

## ब्रह्म आणि माया.

श्लोक.

कुरंग-मातंग-पतंग-भृङ्ग-मीना हताः पंचभिरेव पंच ।
एकः प्रमाथी स कथं न हन्यते यस्सेवते पंचभिरेव पंच ॥

—श्रीमद्भागवत

### अर्थ

आर्या—नादे हरिण स्पर्शें गजरूपाने पतंग भ्रमर रसे ।
गंधास्तव मीन मरे विषयाचा काम आत्मनाश करी ॥ १ ॥
एकैक विषय केवळ घातक जीवासि जरि असा होतो ।
पाचाचा लोभ धरी त्या मनुजा घात नच कदा चुकतो ॥ २ ॥

( अभंग )

माया अप्रमेय तैशीच अनादी । ऐसा श्रुतिवादीं बोध असे ॥ १ ॥
तैशीच ती जड मोहात्मक साची । वाणी ही वेदाची मिथ्या नोहे ॥ २ ॥
ईशशक्तिकार्य ह्यास्तव अनादी । सदसत्त्व बाधीं अप्रमेय ॥ ३ ॥
स्वरूपविस्मृति तें मोहात्मकत्व । तैसेचि जडत्व चिद्भावीं ॥ ४ ॥
सत् म्हणो तें नासे असत् तरी भासे । सदसत्त्वीं ऐसें तिचे रूप ॥ ५ ॥
अनिर्वचनीय ऐशीच ती बोली । शास्त्रान्तरीं झाली एतदर्थ ॥ ६ ॥
ब्रह्मीं अल्पभागीं जीवा भास तीचा । जडत्वास कैचा ठाव ब्रह्मीं ॥ ७ ॥
स्वस्थानाते त्यागी सेवूनियां अन्य । नोहे ती अनन्य कोणे ठायीं ॥ ८ ॥
आत्मा चिदाभास अथवा तें मन । प्रत्यक्षत्वें कोण दावूं शके ॥ ९ ॥
अनेक विकार मनास जे होती । तेहि न दिसती प्रत्यक्षत्वे ॥ १० ॥
आपुलीच निद्रा तीते पाहूं जातां । तिची प्रत्यक्षता नाहीं कोणा ॥ ११ ॥
प्रापंचिक कार्यीं थकोनी पंडित । बहुधा म्हणत " नेति नेति " ॥ १२ ॥
मग जीव ईश वा तें परब्रह्म । इंद्रियांतें गम्य केवी होती ॥ १३ ॥

स्थूल सृष्टीच्या जें पैल तीरीं राहे । त्यातें दावी पाहे सूक्ष्म दृष्टि ॥ १४ ॥
ज्ञान अज्ञानाचीं चिन्हें जीं अनेक । तींच दावी देख स्थूलदृष्टि ॥ १५ ॥
ज्ञानातें लपवी तो वाटे अज्ञानी । ढोंगी शब्दज्ञानी वाटे साधु ॥ १६ ॥
स्थूलदृष्टीद्वारें देखती अनेक । तेणें सद्विवेक होत नाहीं ॥ १७ ॥
परी तत्वता तें ज्ञानावीण कांहीं । पहाणेंचि नाहीं कदा काळीं ॥ १८ ॥
कळे वा न कळे ऐसें जे बोलणें । ज्ञानकलेवीणें कोण बोले ॥ १९ ॥
अव्यक्त दिसेना व्यक्त ते आभासें । व्यक्ताव्यक्तीं असे समब्रह्म ॥ २० ॥
चिज्जडाचो ग्रंथि नाश पावे जेव्हां । ब्रह्मज्ञान तेव्हां स्पष्ट होतें ॥ २१ ॥
प्रज्ञान भासवी सर्व सृष्ट जड । स्वतः ते अजड दृश्य नोहे ॥ २२ ॥
अस्पष्ट प्रकाशीं आरसा जैं राहे । पाहणारा पाहे **प्रतिबिंबें** ॥ २३ ॥
परी आरसा तो तयाला दिसेना । ना तीं **बिंबें** नाना दिसताती ॥ २४ ॥
तेवींच बुद्धींत ब्रह्माची चित्प्रभा । पडे ती सद्भावा आणी जगा ॥ २५ ॥
ब्रह्मरूप **बिंब** तेंचि होय सत्य । जग हें असत्य **प्रतिबिंब** ॥ २६ ॥
**प्रतिबिंब** पाहे तोचि **चिदाभास** । मानितो जगास सद्भावानें ॥ २७ ॥
चिदाभासमय बुद्धि जेव्हां होते । तेव्हां ती देखते मायाकार्य ॥ २८ ॥
ब्रह्माची चित्कला बुद्धींतूनि फिरे । माघारीं तैं विरे श्यमान ॥ २९ ॥
नंतर ती ¦ बबीं ऐक्यभावा । आत्मज्ञान ठेवा तेव्हां लाभे ॥ ३० ॥
अंतर्मुख दृष्टि ऐशी केल्यावीना । नाहीं आत्मज्ञाना अन्य मार्ग ॥ ३१ ॥
कल्पना स्फूर्तीनें ब्रह्मशक्ति क्रीडे । तेव्हां दळ्वाडे व्यक्तित्वाचे ॥ ३२ ॥
ह्या प्रकारे ईशा आणि जगा जीवा । व्यक्तित्वाच्या भावा आणि माया॥३३॥
भावीं व्यक्तित्वाच्या उद्भवे अहंता । तीसवें ममता पाठी लागे ॥ ३४ ॥
भिन्नत्व ते माया एकत्व तें ब्रह्म । मायायोगें कर्म उद्भवतें ॥ ३५ ॥
ब्या स्थळाची जेव्हां माया व्याप्ति करी । तेव्हां तेथें हरि नियामक ॥३६॥
तो समष्टिरूपी ईश्वर जाणावा । जीवत्वाच्या भावा येई व्यष्टि ॥ ३७ ॥

समष्टीच्या पोटीं राहताती व्यष्टि । त्याच्या योगें कष्टी ना तो ईश ॥ ३८ ॥
मायाकार्य जग कर्ता वाटे हरि । परि तो अंतरीं ब्रह्मरूप ॥ ३९ ॥
ईशासम ज्ञानी आणि तत्वदर्शी । अंतरा न स्पर्शी माया त्याच्या ॥ ४० ॥
ऐसे सर्व योगी आणिक तो हरि । सारेचि अंतरीं ब्रह्मरूप ॥ ४१ ॥
उपाधिभिन्नत्वे न्यूनाधिक्य काहीं । नाहीं त्याच्या ठायीं कदा काळीं ॥ ४२ ॥
उपाधीशीं तया कदा नोहे संग । अंतरीं निस्संग अद्वैतत्वे ॥ ४३ ॥
राजा आणि राणी व्यक्ति जरी भिन्न । तरी त्यां समान लेखी जग ॥ ४४ ॥
बहुरूप्यापरी बाह्योपाधि भिन्न । अंतरीं अभिन्न सारे ज्ञानी ॥ ४५ ॥
ईशाच्या शक्तीचा जगाला आधार । मुमुक्षूंचा भार योग्यावरी ॥ ४६ ॥
दृश्यदेह मुळीं ईश्वरासी नसे । परि योगी वसे प्रत्यक्षत्वे ॥ ४७ ॥
मुमुक्षूंना गुरु ह्या कारणे श्रेष्ठ । त्याहूनि वरिष्ठ नसे ईश ॥ ४८ ॥
जीवेश ह्या भावां आद्यतीं तें ब्रह्म । सर्वमिदं ब्रह्म हा इत्यर्थ ॥ ४९ ॥
आद्यंतीं अव्यक्त आणि मध्यें व्यक्त । दृश्यभावीं भक्त ज्ञानी नोहे ॥ ५० ॥
निद्रितांचे स्वप्न जैसें मिथ्या असे । दृश्यत्व ते तैसें दीर्घ स्वप्न ॥ ५१ ॥
पुण्यपापक्षयीं ज्ञानें होतां मोक्ष । जीवत्व प्रत्यक्ष नष्ट होते ॥ ५२ ॥
जीवत्व दे माया ती ईशाची शक्ति । तीपासाव मुक्ति इच्छितो जो ॥ ५३ ॥
तयाने प्रथम ईशासी शरण । गुरुरूपीं पूर्ण व्हावें आद्य ॥ ५४ ॥
परी पराक्रम मायेचा तो भारी । दुरत्ययां हरि म्हणे तीते ॥ ५५ ॥
जीवांना मोहाया माया अति दक्ष । जावों नेदी लक्ष ईशाकडे ॥ ५६ ॥
अनंत रूपानें नटूनि गोजिरी । दिसते साजिरी ज्ञानाभावीं ॥ ५७ ॥
तिचें मिथ्यापण जाणण्याचीं बुद्धि । होण्यास अवधी देईना ती ॥ ५८ ॥
सच्चिदानंदाते सारूनियां मागें । सत्यांभासयोगें मोही जीवां ॥ ५९ ॥
मायानदीमध्यें बुडाले अनेक । पुढेंहि असंख्य बुडणार ॥ ६० ॥
मायोदरीं वस्तीं क्रूर जळचरां । त्यांचा असे मारा दुर्धरचि ॥ ६१ ॥

शब्द स्पर्श रूप रस आणि गंध । हेचि होती मैंद जळचर ॥ ६२ ॥
ह्याचे जे चिंतन तेंचि ब्रह्माद्वैता । नाशी प्रथमतः ठायीं ठायीं । ६३ ॥
द्वैताचे जें ध्यान ते सदा दुःसगा । लावी त्या निस्संगा जीवात्म्याते ॥६४॥
रिपुश्रेष्ठ काम उद्भवे तेथून । इच्छाभंगें जाण येई क्रोध ॥ ६५ ॥
इष्ट लाभापाठीं लोभ मोह येती । त्यांचीहि गति क्रोधासम ॥ ६६ ॥
तैसाचि मत्सर आणिक तो मद । देती सारे पाद स्मृतिशिरीं ॥ ६७ ॥
स्मृतिभ्रंशापोटीं होतो बुद्धिनाश । तोचि होय पाश मृत्युमय ॥ ६८ ॥
ऐसाचि तो मृत्यु येई वेळोवेळा । किती ही प्रबळा माया नदी ॥ ६९ ॥
विश्वकुटुंबी हे रिपु सहा जण । त्यांना तोडी पण ऐसा क्वचित् ॥ ७० ॥
लावूनि आमिष टाकिताती गळ । फुसकिती खळ जीवमीनां ॥ ७१ ॥
विषयदरीचे व्याघ्रचि हे होती । ओढोनियां नेती जीवां तींत ॥ ७२ ॥
भक्तिज्ञानमार्गी मारेकरी होती । मध्यें प्राण घेती तेथें जाता ॥ ७३ ॥
वासनेचा त्याग केल्यावीना कांहीं । रिपुनाशा नाहीं अन्य मार्ग ॥ ७४ ॥
वासनात्यागानें होतो मनोनाश । प्रपंचाचे पाश तोडी तोचि ॥ ७५ ॥
पूर्णत्वे सातत्व असे मायेठायीं । त्यावरून कांहीं बोध घ्यावा ॥ ७६ ॥
तिचा अंत व्हावा हेंचि कार्य जीवा । त्यावीण विसांवा कोठें नाहीं ॥ ७७ ॥
अहंतेचा त्याग हेंचि तिशीं क्रौर्य । शस्त्रास्त्रांचें शौर्य व्यर्थ तेथें ॥ ७८ ॥
कामिनीकटाक्षें नोहे चित्त भिन्न । ब्रह्मचारी कोण ऐसा शूर ॥ ७९ ॥
तेवीं द्रव्यास्तव मोठाले व्युत्पन्न । कर्में बहु हीन आचरती ॥ ८० ॥
अधिकारमदें दुष्कर्माचरण । कितीएक जाण चालविती ॥ ८१ ॥
जनमान्यतेची कोणी धरी हांव । तिच्याचि पासाव आत्मघात ॥ ८२ ॥
मायादुर्गीं ऐसे जन बंदिवान । सत्याला ना कोण वाली तेथें ॥ ८३ ॥
थोर थोर जेथें दांतीं घेती तृण । दाद तेथें कोण देई सत्या ॥ ८४ ॥
सत्य लाभासाठीं शास्त्रीं होती मार्ग । ह्या प्रपंचदुर्ग जिंकण्याचें ॥ ८५ ॥

त्या मार्गी प्रवृत्ति ईशकृपेवीण । नोहे वाटे शीघ्र सत्कर्माचा ॥ ८६ ॥
इंद्रियांच्या जयें काम ल्या जाय । तेणें प्राप्त होय मनोनाश ॥ ८७ ॥
योग्या प्राणजये लाभे मनोनाश । प्रपंचाचे पाश तोचि तोडी ॥ ८८ ॥
प्रपंची विरक्ति तीच चित्तशुद्धि । मग रमे बुद्धि स्वात्मरूपीं ॥ ८९ ॥
स्वात्मरूपीं बुद्धि स्थिरावे अखंड । तेव्हा मोडे बंड त्या मायेचें ॥ ९० ॥
मायानाशाङ्किन नोहे जीवन्मुक्ति । ही असे प्रतीति योग्यानाचि ॥ ९१ ॥
वासनात्यागानें होतो मायानाश । तैं तुटती पाश ह्या भवाचे ॥ ९२ ॥
पुढे होई ज्ञान तेणें आत्मलाभ । जेथे न संभव प्रपंचाचा ॥ ९३ ॥
ऐशा लाभासाठीं शरण तुला साई । रामय्या हा येई मनोभावे ॥ ९४ ॥

## साधन साध्य.

( अभंग )

सत्कर्म सद्भक्ति वा तें सत्यज्ञान । सत्पद समान तिन्ही ठायीं ॥ १ ॥
एतदर्थ तिन्ही एकरूप होती । भेदाची प्रतीति नाहीं तेथें ॥ २ ॥
गीतात्याध्यायीं जे **स्वभावज** कर्म । वर्णिलें तो धर्म प्रकृतीचा ॥ ३ ॥
त्या कर्माच्या त्यागा न काहीं उपाव । निश्चित हा भाव सांगे कृष्ण ॥ ४ ॥
**लोकसंग्रहासी** क्षात्रधर्मी ठाव । **श्रेष्ठावीण** वाव तो इतरां ॥ ५ ॥
**श्रेष्ठ नराधिप** ही दशमाध्यायीं । व्याख्या शेषशायी स्पष्ट सांगे ॥ ६ ॥
श्रीकृष्ण जनक तैसाचि अर्जुन । क्षात्रत्वे अभिन्न तिघे होते ॥ ७ ॥
लोकाचें पालन हे लोकपालाचें । कार्य होय साचें शास्त्रान्वयें ॥ ८ ॥
**लोकसंग्रहाचें कार्य** ह्याचि भावें । लागे आचरावें **नराधिपां** ॥ ९ ॥
गीतेच्या सत्राव्या अध्यायांतीं **कर्म** । वर्णिलें ते धर्म्य त्रैवर्णिका ॥ १० ॥
त्या कर्मा **प्रशस्त** म्हणतसे गीता । तदन्य सर्वथा **अप्रशस्त** ॥ ११ ॥
एवं जी **यज्ञार्थ** तींचि उपादेय । तदितर हेय होतीं कर्में ॥ १२ ॥
प्रजांसवें यज्ञ निर्मिले ब्रह्मयाने । त्यांच्या सहायाने चाले जग ॥ १३ ॥

चतुर्थ अध्यायीं यज्ञाचा विस्तार । सांगोनी श्रीवर वर्णी यज्ञ ॥ १४ ॥
यज्ञ-तप-भोक्ता एक असे हरि । ऐशीच वैखरी गीता वदे ॥ १५ ॥
" अहं यज्ञः " ऐशी आहे कृष्णवाणी । तेणें चक्रपाणी करी बोध ॥ १६ ॥
कीं विष्णुप्रीत्यर्थ न होतीं जीं कर्मे । तीं सारीं विकर्मे कर्मयोगीं ॥ १७ ॥
एक शुद्ध भक्ति कर्मयोगीं दावी । विश्वाचा गोसावी ह्या प्रकारें ॥ १८ ॥
" व्यवसायोस्मि" हे वचन वदोनी । ईशप्रणिधानीं योजी योग्यां ॥ १९ ॥
ऐशा प्रणिधानें स्वयोगमार्गाचा । उपक्रम साचा करी हरि ॥ २० ॥
" व्यवसायात्मिका " तीच ईशपर । बुद्धि अत्युदार मोक्षदात्री ॥ २१ ॥
यज्ञामाजीं श्रेष्ठ असे जपयज्ञ । प्रपंच अयज्ञ हा गीतार्थ ॥ २२ ॥
सोळाव्या अध्यायीं शास्त्रप्रामाण्याचा । आदेश हरीचा वदे गीता ॥ २३ ॥
अशास्त्रीय कर्म त्याज्यता येतसे । तेथें कधीं नसे यज्ञा स्थान ॥ २४ ॥
यज्ञ दान तप सात्विक आहार । हींच कर्मे थोर गीतान्वयें ॥ २५ ॥
आत्मोन्नतीसाठीं तींच आचरावीं । इतर सोडावीं दैवावरी ॥ २६ ॥
इत्यर्थ इतुका कर्मयोगीं असे । ऐसे वदतसे हरिवाणि ॥ २७ ॥
तिचा विपर्यास करिती अभक्त । भौतिकीं आसक्त होऊनियां ॥ २८ ॥
गुणातीत व्हाया अर्जुनासी सांगे । श्रीरंगें निजांगें गीतेमध्यें ॥ २९ ॥
ह्यातील रहस्य उमजेल ज्यांना । योगवर्म त्यांना खरें कळे ॥ ३० ॥
फलार्पण ईशा करूनी स्वकर्म । करावे हा धर्म सांगे गीता ॥ ३१ ॥
स्वकर्म सहज त्याविण ते हेय । नव्हे उपादेय असहज ॥ ३२ ॥
स्वभावज आणि शास्त्रोक्त जीं कर्मे । तदन्य विकर्मे वदे हरि ॥ ३३ ॥
रागात्मक रज रजोद्भूत कर्म । आसुरी तो धर्म प्रकृतीचा ॥ ३४ ॥
कर्मारंभ ऐशासाठीं त्याज्य होय । ही जाणती सोय सद्भक्तचि ॥ ३५ ॥
कर्म ब्रह्मार्पण करितां तें सारें । त्यामाजीं न शिरे अहंभाव ॥ ३६ ॥
कर्म प्रकृतीपें ठेवूनि अलिप्त । राहील तो लिप्त नव्हे तेणें ॥ ३७ ॥

ऐशी कर्मबाधा गेल्या क्रियमाण । मरे ऐशी खूण ठावी भक्ता ॥ ३८ ॥
" प्रारब्ध कर्मणाम् भोगादेव क्षयः " । ऐसे जाई लया ते प्रारब्ध ॥३९॥
देहात्मतानाशीं सर्व कर्मनाश । होतसे प्रत्यक्ष अखिलचि ॥ ४० ॥
सचितहि तेव्हा जातसे विलया । कर्मत्रय क्षया जाय जेव्हा ॥ ४१ ॥
विकर्म त्यागूनी सत्कर्म ईशासी । अर्पितां त्याच्याशीं योग होतो ॥ ४२ ॥
ईश स्वभक्ताचे तोडी मायापाश । भक्तीनें चित्तास शुद्धि ऐशी ॥ ४३ ॥
चित्तशुद्धि होता उद्भवे वैराग्य । तेचि महद्भाग्य मोक्षहेतु ॥ ४४ ॥
पुढे त्याचें कर्म घडते ज्ञानार्थ । अन्यत्र त्या स्वार्थ न गमेचि ॥ ४५ ॥
ऐशी शुद्ध भक्ति क्षेत्रक्षेत्रज्ञाचे । ज्ञान देई साचें सद्भक्ताते ॥ ४६ ॥
अविभक्तत्वे जी परमेशभक्ति । तीच आत्मरती ज्ञानियांची ॥ ४७ ॥
स्वभावज श्रद्धा श्रद्धामय जीव । भिन्न निष्ठाभाव तेणे जीवा ॥ ४८ ॥
भिन्न अधिकारी भिन्न मार्ग तया । कथी कृष्णराया गीतेमाजीं ॥ ४९ ॥
परि वैराग्य ते अवश्य सर्वांसी । ऐसें हृषीकेशी वदलासे ॥ ५० ॥
निस्त्रैगुण्य व्हावा अर्जुनासीं सांगे । त्या निस्त्रैगुण्यागें अनारंभ ॥ ५१ ॥
निर्द्वंद्व त्वां व्हावे तैसेंचि आत्मवान् । ऐसें श्रीभगवान् वदे त्यासी ॥ ५२ ॥
निर्योगक्षेमवान् व नित्यसत्वस्थ । व्हाया हृदयस्थ सांगे त्याला ॥ ५३ ॥
ज्ञानवैराग्याचीं लक्षणें हीं सारीं । त्यां योगें मुरारी वर्णी आत्मा ॥ ५४ ॥
प्रथम ही आज्ञा करूनियां मग । पुढें कर्मयोग निरूपिला ॥ ५५ ॥
हेतु हा कीं त्याच्या प्रारब्धकर्मांतीं । पूर्ण ज्ञानप्राप्ती व्हावी त्याला ॥५६॥
प्रारब्धबलानें आरंभिल्या युद्धीं । मोहें त्यागबुद्धि झाली त्याला ॥ ५७ ॥
अशक्य तो त्याग आणि पापमूल । हें सांगाया बोल पुढील ते ॥ ५८ ॥
अधिकारान्वयें कर्म-भक्ति-ज्ञान । ह्यांचें उपासन इष्ट असे ॥ ५९ ॥
सर्वांगोपदेश एतदर्थ हरि । गीतेमाजी करी सविस्तर ॥ ६० ॥
पूर्वजन्मीं होते नरनारायण । तेचि पार्थ कृष्ण गीतेंतील ॥ ६१ ॥

दैवी प्रकृतीची स्वभावतः पार्थ। सुखीं ज्ञानीं स्वार्थ वाटे त्याला ॥ ६२ ॥
परि अवतारकार्य सपवाया। प्रारब्धेचि त्या दिला जन्म ॥ ६३ ॥
प्रारब्धाचें कार्य सपविल्याविना। त्यागाची कल्पना ती अनिष्ट ॥ ६४ ॥
तत्पूर्वीच्या त्यागे जन्ममृत्यु लागे। अविक्रचि मागे तत्सिध्यर्थ ॥ ६५ ॥
ते सपल्यावरी कर्मत्याग इष्ट। ऐसे सांगे स्पष्ट श्रीभगवान ॥ ६६ ॥
कर्ममूल सारा प्रपंच हा असे। कोण्या न्याये नासे तो कर्माने ॥ ६७ ॥
आपुलिया जगा नाव कर्मभूमि। अन्या भोगभूमि वदे शास्त्र ॥ ६८ ॥
तेवी नरदेहा सज्ञा कर्मयोनी। अन्या भोगयोनी म्हणे शास्त्र ॥ ६९ ॥
सुकर्मे श्रेष्ठत्व कुकर्मे पतन। शास्त्रीं हे कथन केले असे ॥ ७० ॥
ऐसा कर्ममार्ग जन्ममृत्युमय। पद अनामय न देई तो ॥ ७१ ॥
कर्म ब्रह्मार्पणीं त्यागाचा उगम। तेणेचि सुगम भक्त्युद्भव ॥ ७२ ॥
ब्रह्मार्पित कर्मी न घसे फलाशा। तोडी मायापाशा अनासक्ति ॥ ७३ ॥
फलत्यागरूपी योग तो संन्यास। भक्तियोग त्यास दुजे नांव ॥ ७४ ॥
कर्मपूर्वी फल हे तो असंबद्ध। फल होतां सिद्ध तें त्यागावें ॥ ७५ ॥
कर्मफलत्याग ऐसा हा कठिण; कर्म ब्रह्मार्पण न त्याविना ॥ ७६ ॥
कर्म ब्रह्मार्पण करूनी जो भोगी। तत्फल अभागी म्हणावें त्या ॥ ७७ ॥
अब्रह्मार्पित कर्म भोगी त्याचें फळ। चोरचि केवळ तो होतसे ॥ ७८ ॥
फलत्यागाविना कर्मीं निष्कामता। दंभचि तत्त्वता ठरते ती ॥ ७९ ॥
आशा दुरत्यया आणोनी श्रीहरि। **इष्टफल वारी यज्ञकर्मीं** ॥ ८० ॥
**ऐसें यज्ञकर्म** सद्भक्तीच्या द्वारे। सत्यज्ञानीं विरे तैंचि मोक्ष ॥ ८१ ॥
सांख्ययोगरूपी ऐशी एक निष्ठा। तिचीच प्रतिष्ठा गीता करी ॥ ८२ ॥
**दोहींमाजी भिन्नत्व मानिती जे कोणी। त्यातें बालज्ञानी म्हणे कृष्ण** ॥ ८३ ॥
योगामाजीं असे तत्त्वतः संन्यास। **स्वरूपसंन्यास तो सांख्यांचा** ॥ ८४ ॥
बुद्धीने महत्त्व ओळखिती त्यास। **दोन्हींहि संन्यास एकरूप** ॥ ८५ ॥

विविदिषाद्वारें साधका संन्यास । सिद्धाचा संन्यास ज्ञानदृष्ट्या ॥ ८६ ॥
शिखासूत्रत्यागे प्राप्ति संन्यासाची । म्हणतां म्लेंछांची तीच स्थिति ॥ ८७ ॥
अधिकारावीण स्वरूप संन्यासी । तो विटंबनेसी पात्र होय ॥ ८८ ॥
परि मुमुक्षु वा जे ज्ञानसंपन्न । त्या महद्भूषण तेचि होय ॥ ८९ ॥
पार्थ कृष्णसखा आणि कृष्णभक्त । ऐसें असे उक्त गीतेमध्ये ॥ ९० ॥
स्वभक्तांचा मोह गुरूची निवारी । हें दावी श्रीहरि कृष्णरूपें ॥ ९१ ॥
देवतांश पार्थ देहपतनातीं । गेला स्वर्गाप्रती अमुक्तत्वें ॥ ९२ ॥
भोगभूमि स्वर्ग तेथे सरे कर्म । यज्ञादिक धर्म ह्या लोकांचें ॥ ९३ ॥
तयाचा विस्तार आता करूं थोडा । पुढें तो रोकडा संन्यासचि ॥ ९४ ॥
स्वभावनियत दृष्ट वा अदृष्ट । तेवढेंचि इष्ट कर्म असे ॥ ९५ ॥
त्याचा बोध व्हाया पहावे तें शास्त्र । कुतर्काचें अस्त्र त्यागोनिया ॥ ९६ ॥
पार्थासम होती अनघ जे लोक । त्यांचा मार्ग एक न निश्चित ॥ ९७ ॥
शास्त्राज्ञोल्लंघनें प्रल्हादादिजन । गेले उद्धरून किती एक ॥ ९८ ॥
सच्छास्त्रप्रामाण्य सामान्य जनासी । न तदितरांसी उक्त सदां ॥ ९९ ॥
अकर्मे विकर्मे तामस राजस । प्रवृत्त तयांत होऊं नये ॥ १०० ॥
आसुरी संपदा तयाचेचि नांव । पापाचा संभव त्यांपासुनि ॥ १०१ ॥
सात्विक सकाम कर्मे श्रेष्ठ लोक । लाभतो निःशंक शास्त्र वदे ॥ १०२ ॥
परी प्रत्यवाय अभिक्रमनाश । ह्याच्यामुळें त्यांस भय बहु ॥ १०३ ॥
यथासांग झालीं तरीच सफळ । ना तरी निष्फळ पापात्मक ॥ १०४ ॥
ऐशा हेतुस्तव तीं होत अनिष्ट । ऐसें वदे स्पष्ट धर्मशास्त्र ॥ १०५ ॥
हीं सारीं त्यागावीं मग ब्रह्मनिष्ठा । तिचीच प्रतिष्ठा अवशिष्ट ॥ १०६ ॥
ब्रह्मनिष्ठा तीच सांख्ययोगनिष्ठा । तीतेंचि वरिष्ठा म्हणे कृष्ण ॥ १०७ ॥
तियेचें वर्णन अंशे झालें असे । उरलें थोडेसें आतां करूं ॥ १०८ ॥
ईश्वरार्थ कर्मे आत्मज्ञानप्राप्ति । लाभतसे अंतीं तीच मुक्ति ॥ १०९ ॥

फलार्पण ईशीं करूनि सत्कर्म । करावे हे वर्म कर्मयोगीं ॥ ११० ॥
आत्मलाभासाठीं हीच सांगे युक्ति । भगवद्गीतातीं जगद्गुरु ॥ १११ ॥
कर्मफलासक्ति ठेवावी ना कर्वी । श्री भगवान् बोधी गीतेमाजीं ॥ ११२ ॥
कर्म ब्रह्मार्पण करिता ते सारें । मग कोठे नुरे अहंभाव ॥ ११३ ॥
रामदास म्हणे अहंभाव जेथें । ज्ञानोद्भव तेथें नोहे कदा ॥ ११४ ॥
दुष्कर्म त्यागूनी-सत्कर्म ते ईशीं । अर्पितां त्याच्याशीं होतो योग ॥ ११५ ॥
वर्म जाणोनिया करिता अकर्म । ते होते सुकर्म का ते सांगू ॥ ११६ ॥
अंगीं येतां ज्वर त्यागावें तें स्नान । ईशपूजाध्यान साधनार्थ ॥ ११७ ॥
विकर्महि तैशा आचारे सुकर्म । होई त्याचे वर्म सांगू आतां ॥ ११८ ॥
देवासाठीं देखा प्रऱ्हादे तो पिता । भरते स्वमाता त्यागियली ॥ ११९ ॥
ऐसे हरीसाठीं घडे जें जें कर्म । तें होय स्वधर्म कर्मयोगीं ॥ १२० ॥
उपासनामार्गीं नाहीं विभक्तता । ज्यासी तोचि ज्ञाता भक्तराज ॥ १२१ ॥
कायावाचामन अर्पितां देवासी । विभक्तता कैशी पुढे उरे ॥ १२२ ॥
गुरुदेव तुष्टे जेणे तेंच कर्म । करणें हे वर्म सद्भक्तीचे ॥ १२३ ॥
कर्मयोग आणि उपासना मार्ग । होतां यथासाग एकचि ते ॥ १२४ ॥
कर्ता कार्य आणि कारण हीं तिन्हीं । प्रकृतीपासूनी संभवती ॥ १२५ ॥
चिदाभासयोगें जड प्रकृतीत । सुखदुःखाभास होत असे ॥ १२६ ॥
ऐसा यथार्थत्वे भाव निशिदिनीं । ज्ञानियाच्या मनीं वसतसे ॥ १२७ ॥
ऐसा नाहंकारी कर्म दैवप्राप्त । करूनि अप्राप्त नेच्छी कदा ॥ १२८ ॥
भगवंत म्हणे तोचि कीं संन्यासी । नसे दुजी त्यासी संज्ञा कांहीं ॥ १२९ ॥
विधिनिषेधाची आडकाठी कांहीं । तयालागीं नाहीं कदाकाळीं ॥ १३० ॥
आत्मस्वरूपासी पूर्ण अविभक्ति । ज्ञानियाची मुक्ति तीच होय ॥ १३१ ॥
भक्त्यंतीं जें साध्य ज्ञानें तेंचि सिद्ध । इतुकाचि भेद सांख्यीं योगीं ॥१३२॥
केवल विवेके ज्ञात होय आत्मा । सांख्यीं जो महिमा तो एवढा ॥ १३३ ।

यथासांग भक्ति केल्या ईशकृपा । प्राप्त होय बापा योगियाना ॥ १३४ ॥
ईशकृपाद्वारे होय ज्ञानप्राप्ती । तीच होय मुक्ति दुजी नाहीं ॥ १३५ ॥
सांख्य तो आपणा आपण उद्धरी । योग्याना श्रीहरि उद्धरितो ॥ १३६ ॥
एतदर्थ साख्य स्वाधिकारें श्रेष्ट । तुलनेचे श्रेष्ट योग दीना ॥ १३७ ॥
दोन्ही मार्गीं जाता शेखीं प्राप्ति एक । ऐसेंचि निःशक वदे शास्त्र ॥१३८॥
देहासवे कर्म येई जीवामार्गे । प्रारब्धाच्यायोगे दुर्निवार्य ॥ १३९ ॥
तथापि देवाचे ग्रहण वा त्याग । करण्याचा योग स्वेच्छेसम ॥ १४० ॥
आपचि आपुला शत्रु किंवा मित्र । ऐसेंचि पवित्र गीता वदे । १४१ ॥
देवा ओळखावे तयाविना काहीं । दुजा मार्ग नाहीं आत्मलाभा ॥ १४२ ॥
देव ओळखिल्या ज्ञान भक्तिकर्म । सकलांचें वर्म कळतसे ॥ १४३ ॥
देवाची ओळखी झाली नाहीं जव । तिन्ही मार्गीं तंव आडरान ॥ १४४ ॥
शरीरें देउळे आत्मा तोचि देव । त्याविण वाव सर्व जड ॥ १४५ ॥
प्रतिष्ठा देवाची वाढवावी नित्य । देह हो अनित्य ओळखुनी ॥ १४६ ॥
देवा सोडूनिया देऊळाची प्रीति । तीच अधोगति नरदेहीं ॥ १४७ ॥
देऊळाची प्रीति असावी देवार्थी । संशय यदर्थीं धरूं नये ॥ १४८ ॥
देऊळ राखावें लागे देवासाठीं । देवा तयापाठीं न घालावे ॥ १४९ ॥
देवावरी मुख्य ठेवूनियां दृष्टि । कर्म केल्या तुष्टि पावे देव ॥ १५० ॥
देव तुष्ट होता कर्मा लागे क्षय । हा खरा उपाय मुक्त व्हावा ॥ १५१ ॥
सत्कर्में सद्भक्ति घडावयासाठीं । सत्य-ज्ञानदृष्टि लागे आधीं ॥ १५२ ॥
नित्या नित्य वस्तु विवेक हे आद्य । साधन प्रतिपाद्य एतदर्थ ॥ १५३ ॥
ब्रह्म नित्य ऐसे कळेना जोवरीं । अनित्य तोवरी कोण सोडी ॥ १५४ ॥
सत्कर्म सद्भक्ति आणि सत्यज्ञान । कारणें हीं भिन्न कार्य एक ॥ १५५ ॥
मनीं विभक्तता ठेवूनि जी भक्ति । नामरूपाभक्ति तिचें नांव ॥ १५६ ॥
अभक्ताचे ज्ञान विभक्ताचे कर्म । द्वैताचें तें वर्म दुःखरूप ॥ १५७ ॥

# अध्याय ४८ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

आतां हा अध्याय करितां सुरू । जया अत्यंत श्रवणादरू ॥
ऐसा श्रोता लागला विचारूं । गुरु कीं सद्गुरू श्रीसाई ॥ १ ॥

तयाचिया समाधाना । कथूं सद्गुरूच्या संक्षिप्त लक्षणा ॥
जेणें श्रीसाईसमर्थचरणा । मिळतील खुणा सद्गुरूच्या ॥ २ ॥

जयांनि प्राप्त वेदाध्ययन । अथवा साही शास्त्रांचें ज्ञान ॥
जिहीं करविलें वेदांत निरूपण । ज्ञाते न सद्गुरु म्हणती तया ॥३॥

कोणी एक वायू कोंडिती । तप्त मुद्रा धारण करिती ॥
ब्रह्मानुवादें श्रोतयां रिझविती । ज्ञाते न सद्गुरु म्हणती तया ॥ ४ ॥

शिष्यां शास्त्रोक्त मंत्र ही देती । जप करावया आज्ञा करिती ॥
होईल केव्हां फलप्राप्ती । विश्वास न चित्तीं कोणाही ॥ ५ ॥

तत्त्व निरूपण अति रसाळ । शब्दज्ञान अघळपघळ ॥
स्वानुभवाचा मात्र दुष्काळ । शाब्दिक पोकळ तें ज्ञान ॥ ६ ॥

ऐकतेक्षणीं निरूपण नीट । उभय भोगांचा येईल वीट ॥
परी अनुभवाची चवी चोखट । अनुभवी तोच प्रकटवी ॥ ७ ॥

असोनि संपूर्ण शब्दज्ञानी । पूर्णानुभवी अपरोक्षदानी ॥
त्यांचाचि अधिकार शिष्य प्रबोधनीं । म्हणावें त्यालागोनि सद्गुरू ८
स्वयें ज्यातें अनुभव नाहीं । तो काय शिष्यातें देईल पाही ॥
जया न अपरोक्ष अनुभव कांहीं । सद्गुरु कदाही न म्हणावा ॥ ९ ॥
शिष्यापासून घ्यावी सेवा । स्वप्नींही न धरी ऐसिया भावा ॥
उलट शिष्यार्थ निजदेह लागावा । इच्छी तो जाणावा सद्गुरू ॥१०॥
शिष्य म्हणजे किं पदार्थ । गुरु काय तो श्रेष्ठांत श्रेष्ठ ॥
ऐसिया अहंभावा विरहित । तोचि सद्गुरु हितकारी ॥ ११ ॥
शिष्य तोही पूर्णब्रह्म । तयाठायींही पुत्रप्रेम ॥
इच्छी न त्यापासावयोगक्षेम । सद्गुरु तो परम श्रेष्ठ जगीं ॥१२॥
परम शांतीचें जें निधान । विद्वत्तेचा न जेथें अभिमान ॥
सान थोर समसमान ॥ तेंच सद्गुरुस्थान जाणावें ॥ १३ ॥
ऐसीं हीं सर्व साधारणें । सद्गुरुचीं संक्षिप्त लक्षणें ॥
निवेदिलीं म्यां अनन्य शरणें । श्रोतयांकारणें संकलित ॥ १४ ॥
साईदर्शनें तुष्टले लोचन । तया भाग्यवंता लागून ॥
मी काय याहून वर्णूं सकेन । सद्गुरुलक्षण हें सत्य ॥ १५ ॥
जन्मोजन्मीचा पुण्यातिशय । गांठीस होता त्याचा संचय ॥
तेणें हे आम्हांस लाधले पाय । या सद्गुरुराय साईचे ॥ १६ ॥
पूर्ण तारुण्यीं ही अपरिग्रह । निराधार ना वेस ना ग्रह ॥
तमाखू चिलीम हा काय तो संग्रह । मनोनिग्रह भयंकर ॥ १७ ॥
वर्षे अष्टादश असतां वय । तेव्हांपासूनहा पूर्ण मनोजय ॥
सदा एकांतीं वसावे निर्भय । लावूनिया लय स्वरूपीं ॥ १८ ॥
पाहोनि भक्ताची आवडी शुद्ध । भक्तपराधीन मी हे ब्रीद ॥
भक्तवृंदा दावावया विशद । भक्तप्रेमास्पद वर्ते जो ॥ १९ ॥

जय परब्रह्मा सनातना । जय दीनोद्धर प्रसन्नवदना ॥
जय चैतन्यघना भक्ताधीना । दे निजदर्शना निजभक्तां ॥ २० ॥
जयजयाजी द्वंद्वातीता । जयजयाजी अव्यक्त व्यक्ता ॥
सर्वसाक्षी सर्वातीता । अकळअभक्तां सकळिकां ॥ २१ ॥
जयजय भवसंतापहरणा । जयजय भवगजविदारणा ॥
जयजय आश्रितप्रेमपूर्णा । संकट निरसना सद्गुरुराया ॥ २२ ॥
तुज अव्यक्तीं समरसतां । आकार पावला निराकारता ॥
परी तवभक्तकल्याणकारिता । देह ठेवितांही न सरे ॥ २३ ॥
देहीं असतां जी जी कृति । तीच समसरतां अव्यक्तीं ॥
तेच अनुभव आजही भोगिती । जे तव भक्ती लागले ॥ २४ ॥
त्वां मज पामरा निमित्त करुनी । निरसावया अविद्यारजनी ॥
प्रकट केला निज चरित्र तरणी । जो भक्तोद्धरणीं समर्थ ॥ २५ ॥
आस्तिक्य बुद्धि श्रद्धा स्थिती । हीच भक्ताची हृदयपणती ॥
प्रेमस्नेहें उजळिजेवाती । ज्ञानज्योती प्रगटेल ॥ २६ ॥
प्रेमावीण शुष्क ज्ञान । तयाचें कोणा काय प्रयोजन ॥
विना प्रेम न समाधान । प्रेम अविच्छिन्न असावें ॥ २७ ॥
काय वानूं प्रेम महिमान । तयापुढें तुच्छ आन ॥
गाठीं नसल्या प्रेम गहन । श्रवण वाचन निर्फळ ॥ २८ ॥
प्रेमापाशीं नांदे भक्ती । तेथेंच अवघी शांती विरक्ति ॥
तेथेंच पाठी तिष्ठे मुक्ति । निज संपत्ती समवेत ॥ २९ ॥
प्रेम नुपजे भावावीण । भाव तेथें देव जाण ॥
भावा पोटीं प्रेम पूर्ण । भावचि कारण भवतरणा ॥ ३० ॥
गंगोदकसम पवित्र । परमगोड साईचरित्र ॥
तेणेंचि त्याचें सजविलें स्तोत्र । निमित्तमात्र हेमाड ॥ ३१ ॥

श्रवण करितां साईसच्चरित ॥ श्रोते वक्ते नित्य पूत ॥
पापपुण्याचा होई घात । नित्य मुक्त दोघेही ॥ ३२ ॥
भाग्यें आगळे ऐकतां श्रोत्र । भाग्यें आगळे वक्तयाचें वक्त्र ॥
धन्य हें श्रीसाईस्तोत्र । अतिपवित्र निजभक्तां ॥ ३३ ॥
होऊनियां शुद्धचित्त । सद्भावें जे परिसती चरित ॥
तयांचे ते सकळ मनोरथ । होतील सुफलित सदैव ॥ ३४ ॥
परम भावार्थें आदरेंसी । ऐकती या सच्चरितासी ॥
निजपदभक्ति अनायासी । लाभे तयासीं अविलंबें ॥ ३५ ॥
भक्तिभावें साईचरण । सेवितां करितां साईस्मरण ॥
होईना यथेच्छ इंद्रियाचरण । सहज भवतरण रोकडें ॥ ३६ ॥
भक्तचातकां निजजीवन । ऐसें हें साईसच्चरितकथन ॥
श्रोतां श्रवणापाठीं मनन । कीजे श्री आयतन कृपेचें ॥ ३७ ॥
सर्वावस्थीं सावधान । होऊनि श्रोतीं केलिया श्रवण ॥
सहज होय भवतरण । कर्मबंधन तुटोन ॥ ३८ ॥
असो मनीं म्हणतील श्रोते । केव्हांहो आरंभ होणार कथेते ॥
दवडितों त्यांचिया अस्वस्थतेते । प्रस्तावनेतें करोनी ॥ ३९ ॥
पूर्वाध्यायीं झालें कथन । वैरहत्या आणि ऋण ॥
हीं फेडावया पुनर्जन्म । येई निजकर्म भोगावया ॥ ४० ॥
तयांस नाहीं पूर्वस्मरण । परी या संतां कदां न विस्मरण ॥
करिती निजभक्त संकटनिवारण । असेना जनन कोठेंही ॥ ४१ ॥
तैसीच आतां दुसरी कथा । देतां-घेतां बसत उठतां ॥
संतांपायीं विश्वास ठेवितां । पावती सफलता निजभक्त ॥ ४२ ॥
कर्मारंभ करूं जातां । आधीं हरिगुरुचरण स्मरतां ॥
तेच निवारिती निजभक्तचिंता । कर्मी निजदक्षता ठेविलिया ॥ ४३ ॥

कर्म मात्र मी करणार । समर्थ हरिगुरु फल देणार ॥
ऐसा ज्याचा दृढ निर्धार । बेडा पार तयाचा ॥ ४४ ॥
संत आरंभीं उग्र भासती । तरी त्यांपोटीं लाभेविण प्रीति ॥
अल्प धीर पाहिजे चित्तीं । करितील अंती कल्याण ॥ ४५ ॥
शापतापसंसृति माया । सत्संगाची पडतां छाया ॥
ठायींचे ठायींच जातील विलया । म्हणोनि त्या पायां चिकटावें ॥४६॥
सविनय आणि अनुद्धत । होऊनि संतां शरणागत ॥
प्रार्थावें त्यां निजगुजहित । देतील चित्तस्वास्थ्यातें ॥ ४७ ॥
अल्पज्ञानाचिया अभिमानीं । संतवचनीं विकल्प मानी ॥
होते त्या आधीं कैसी हानी । विश्वासें निदानीं कल्याण ॥ ४८ ॥
शुद्धमनें वा कपटें सर्वथा । खऱ्या संताचे चरण धरितां ॥
अंतीं पावे तो निर्मुक्तता । अगाध योग्यता संतांची ॥ ४९ ॥
येअर्थीची बोधक कथा । श्रवण कीजे सावधानता ॥
स्वानंद निर्भर होईल श्रोता । तैसाचि वक्ता उल्लसित ॥ ५० ॥
वकील अक्कलकोट निवासी । सपटणेकर नाम जयासी ॥
परिसा तयांचे अनुभवासी । मन उल्लासित होईल ॥ ५१ ॥
वकीलीचा रात्रंदिवस । करीत असतां ते अभ्यास ॥
भेटले विद्यार्थी शेवडे त्यांस । करीत विचारपूस परस्पर ॥ ५२ ॥
सहाध्यायीही इतर आले । तेथेंच खोलींत एकत्र बसले ॥
प्रश्न एकेका पुसूं लागले । पहाया अभ्यासिलें ताडून ॥ ५३ ॥
पहावें कोठें कोणाचें चुकतें । कोणाचें उत्तर बरोबर येतें ॥
करावें संशयनिवृत्तीतें । चित्तस्वस्थते लागूनी ॥ ५४ ॥
शेवडे यांचीं चुकलीं उत्तरें । अंतीं म्हणाले विद्यार्थी सारे ॥
कैसेन यांची परीक्षा उतरे । अभ्यासिलें अपूरें सर्वंची ॥ ५५ ॥

केला जरी त्यांनीं उपहास । शेवड्यांचा पूर्ण विश्वास ॥
पुरा वा अपूरा अभ्यास । वेळीं मी पास होणार ॥ ५६ ॥
मी न जरी अभ्यास केला । माझा साईबाबा मजला ॥
पास कराया आहे बैसला । करूं मी कशाला काळजी ॥ ५७ ॥
परिसतां ऐसिया बोला । आश्चर्य वाटलें सपटणेकरा ॥
नेऊन शेवड्यांस एके बाजूला । पुसावयाला लागले ॥ ५८ ॥
अहो हे साईबाबा कोण । ज्यांचे एवढे वर्णितां गूण ॥
ज्यांवर तुमचा विश्वास पूर्ण । वसतीचा ठाव कवण कीं ॥५९॥
मग त्या साईबाबांची महती । प्रत्युत्तरीं शेवडे कथिती ॥
सर्वेचि आत्मविश्वास स्थिती । तयांसी वदती प्रांजळपणें ॥ ६० ॥
सुप्रसिद्ध नगर जिल्हा । त्यामाजील शिर्डी गांवाला ॥
फकीर एक मशिदीं वसला । असे बहु नांवाजला सत्पुरुष ॥ ६१ ॥
संत आहेत जागोजाग । परी तयांचे भेटीचा योग ॥
गांठीस नसतां पुण्य अमोघ । प्रयत्नें हा सुयोग लाभेना ॥ ६२ ॥
विश्वास माझा पूर्ण त्यावर । करील तो जें तेंच होणार ॥
वदेल वाचें तेंच घडणार । नाहीं तें चुकणार कल्पांतीं ॥ ६३ ॥
कितीही केल्या यंदा प्रयास । परिक्षेंत मी होणार नापास ॥
परी पुढील वर्षीं अप्रयास । होणार मी पास त्रिसत्य ॥ ६४ ॥
मज हें आहे त्याचें अश्वासन । तयावर माझा भरवसा पूर्ण ॥
होणें न त्याचें अन्यथा वचन । गांठ मी बांधून ठेविलीसे ॥ ६५ ॥
नवल काय ही तों होईल । होईल परीक्षा याच्याही पुढील ॥
हास्यास्पद हे वाटले बोल । निःसंशय फोल सपटणेकरा ॥ ६६ ॥
विकल्पपूर्ण त्यांचें मन । त्यांना हें काय आवडे कथन ॥
असे शेवडे गेले तेथून । परिसा तें वर्तमान पुढील ॥ ६७ ॥

पुढें कालें अनुभवांतीं । अन्वर्थ झाल्या शेवड्यांच्या उक्ती ॥
दोनीही परीक्षा पास होतीं । आश्चर्य चित्तीं सपटणेकरां ॥ ६८ ॥
पुढें जातां दहा सालें । सपटणेकर उद्विग्न झाले ॥
दुर्दैव एकाएकीं ओढवलें । तंव ते पावले उदासता ॥ ६९ ॥
एकुलता एक मुलगा त्यांला । कंठरोगानें निधन पावला ॥
सन एकूणीससें तेरा सालाला । अत्यंत विटला संसारा ॥ ७० ॥
आदी करून पंढरपूर । गाणगापूरादी तीर्थें समग्र ॥
झालीं परी न सुखावे अंतर । वाचिला नंतर वेदांत ॥ ७१ ॥
ऐसा कांहीं काळ लोटतां । चित्तास कांहीं येते का शांतता ॥
म्हणूनि मार्गप्रतीक्षा करितां । आठवला वृत्तांत शेवड्यांचा ॥ ७२ ॥
शेवडे यांचा निश्चय स्मरला । साईपदींचा विश्वास आठवला ॥
आपणही जावें श्रीदर्शनाला । वाटलें मनाला तयांच्या ॥ ७३ ॥
संत दर्शनीं धरिला हेत । सन एकोणीससें तेरा सालांत ॥
शिर्डीस जाण्याचा झाला बेत । निघाले समवेत बंधूच्या ॥ ७४ ॥
निमित्त शेवडे यांचें स्मरण । वंदावया आपुले चरण ॥
साईच तया करिती पाचारण । तें सावचित्त श्रवण करा ॥ ७५ ॥
पंडितराव कनिष्ठ सहोदर । तयां घेऊनियां बरोबर ॥
संतदर्शना सपटणेकर । निघाले सपरिवार शिर्डीस ॥ ७६ ॥
असो ते दोघे तेथें आले । येतांच श्रीच्या दर्शना निघाले ॥
दुरून बाबांचे दर्शन झालें । अत्यंत धाले चित्तांत ॥ ७७ ॥
दुरूनि परी ती डोळेभेट । होतांच सत्वर गेले निकट ॥
दोघेही जोडून करसंपुट । समोर तिष्ठत बाबांचे ॥ ७८ ॥
दोघेही ते अति विनीत । बाबासन्मुख लोटांगणीं येत ॥
श्रीफळ साईचरणीं समर्पित । शुद्धभावान्वित सप्रेम ॥ ७९ ॥

श्रीफळ अर्पितां सपटणेकर । समर्थांचिया चरणावर ॥
"चलहट्ट" शब्दें बाबा धिक्कार । करीत सपटणेकर यांचा ॥८०॥
सपटणेकर चिंताग्रस्त । बाबा व्हावे का संतप्त ॥
मनीं म्हणती बाबांचे परिचित । पाहूनि त्यां इंगित पुसावें ॥८१॥
दर्शनें जें व्हावें प्रसन्न । तेच या शब्दें अत्यंत खिन्न ॥
होऊन सचिंत अधोवदन । बैसले सरकून माघारा ॥ ८२ ॥
आतां कोणापासीं जावे । कोणा भक्तालागीं पुसावें ॥
काय बाबांच्या बोलांत असावें । मनोगत पुसावें कोणास ॥ ८३ ॥
ऐसा त्यांचा पाहूनिभाव । कोणी त्यांचिया समाधानास्तव ॥
कथितां बाळा शिष्याचें नांव । शोधिला ठाव तयाचा ॥ ८४ ॥
तयालागीं सपटणेकर । निवेदिते झाले वृत्तांत साग्र ॥
म्हणाले बाबा माझा धिक्कार । करिती अत्युग्रवाचेनें ॥ ८५ ॥
तुम्ही तरी मजसवें यावें । दर्शन शांतपणें करवावें ॥
कृपावलोकन बाबांचें व्हावें । कोपा न यावें आम्हावरी ॥ ८६ ॥
असो हें बाळानें मान्य केलें । सपटणेकर निश्चित झाले ॥
फोटो बाबांचे विकत आणविले । दर्शना निघाले बाबांच्या ॥ ८७ ॥
बाळा शिंपी होता संगतीं । फोटो घेऊनि आपुले हातीं ॥
बाळा मग देउनि बाबांप्रती । बाबांस विज्ञप्ति करिताहे ॥ ८८ ॥
काय हें देवा कसलें चित्र । पाहूनि बाबा देती उत्तर ॥
हा फोटो आहे याचा यार । बोटानें सपटणेकर दावीत ॥ ८९ ॥
ऐसें बोलून बाबा हांसले । मंडळीसही हांसू आलें ॥
बाबा काय हो इंगीत यांतलें । बाळानें पूसिलें बाबांस ॥ ९० ॥
तात्काळ बाळा सपटणेकरा । म्हणे घ्या दर्शन करा त्वरा ॥
मग ते करितां नमस्कारा । " चलहट्ट " उद्गारा परिसिलें ॥९१॥

तेच पूर्वील " चलहट्ट " । अजून माझी पुरवी पाठ ॥
आतां काय करावी वाट । आश्चर्य उद्भट सपटणेकरां ॥ ९२ ॥
मग ते दोघे जोडूनि कर । तिष्ठत असतां बाबांसमोर ॥
' निघून जा येथूनि सत्वर ' । आज्ञा त्यां अखेर बाबांची ॥ ९३ ॥
वाक्य तुमचें स्वामीसमर्था । अनुल्लंघ्य कोणाही सर्वथा ॥
काय आम्हा पामरांची कथा । निघालों आतां येच घडी ॥ ९४ ॥
ऐकोनि आपण महा उदार । दर्शना आलों तों धिक्कार ॥
"चल हट्ट " शब्दें आमुचा सत्कार ॥ काय हा चमत्कार कळेना ॥९५
तेव्हां असावें कृपावलोकन । द्यावे आम्हा आशिर्वचन ॥
व्हावे सत्वर पुनर्दर्शन । ऐसें आश्वासन मागितलें ॥ ९६ ॥
ऐसा कोण आहे ज्ञानी । जाणेल काय बाबांचे मनीं ॥
परंतु झालेली आज्ञा मानुनी । गेले स्वस्थानीं माघारां ॥ ९७ ॥
ऐसें हे त्यांचें प्रथम दर्शन । तेणें ते दोघे अति उद्विग्न ॥
गेले अपुले गांवा परतोन । यत्किंचित विलंब न करितां ॥ ९८ ॥
पुढें आणीक वर्ष गेलें । तरीही न मन स्थीर झालें ॥
पुनश्च गाणगापूर केले । चित्त भडकले अधिकच ॥ ९९ ॥
विश्रांत्यर्थ सपटणेकर । गेले माढेगांवीं नंतर ॥
काशीक्षेत्रीं जाण्याचा विचार । केला कीं अखेर तयांनीं ॥ १०० ॥
आतां काशीस निघावयास । उरले अवघे दोनच दिवस ॥
झाला दृष्टांत निजकांतेस । राहिला प्रवास काशीचा ॥ १०१ ॥
दृष्टांताचा चमत्कार । कैसा त्याचा अभिनव प्रकार ॥
कथितों व्हावें श्रवणतत्पर । लीलाचरित्र साईचें ॥ १०२ ॥
झोपेंत असतां शेजेवर । स्वप्नसृष्टी डोळ्यांसमोर ॥
बाई घेऊनियां घागर । जाई विहिरीवर लक्कडशाचे ॥ १०३ ॥

तेथें एका निंबातळीं । डोईस जो फडका गुंडाळी ॥
ऐसा एक फकीर ते वेळीं । म्हणे मजजवळी पातला ॥ १०४ ॥
"कां व्यर्थ श्रमसी बाळ" । फकीर उद्गारला स्वरें कोमळ ॥
भरून देतों तुझी ही सकळ । घागर निर्मळ उदकेसीं ॥ १०५ ॥
वाटली भीती फकीराची । घेऊन घागर रिकामीची ॥
वाट माघारा धरिली घराची । सवें मागेमागेंची फकीर ॥ १०६ ॥
ऐसियेपरी पाहूनि स्वप्न । जागी झालें उघडले नयन ॥
परिसून कांता स्वप्न निवेदन । नेमिले गमन शिर्डीचें ॥ १०७ ॥
तेच मुहूर्तीं दोघें निघालीं । उदईक शिर्डीग्रामा पातलीं ॥
येतांच मशीदीमाजी गेली । बाबा तें कालीं लेंडीवर ॥ १०८ ॥
बाबा परत येईपर्यंत । बैसती झालीं दोघेंही तेथ ॥
बाबांची मार्गप्रतीक्षा करित । बाबा तंव इतुक्यांत पातले ॥ १०९ ॥
मूर्ती जी देखिली दृष्टांतांत । तीच ती पाहून नखशिखांत ॥
बाई जाहली विस्मयान्वित । मग ती न्याहाळीतचि राहिली ॥ ११० ॥
होतां बाबांचें पादक्षालन । बाई गेली घ्यावया दर्शन ॥
करोनि साईपदाभिवंदन । बैसली अवलोकन करितचा ॥ १११ ॥
पाहोनि तियेची विनीतता । उल्लास साईनाथाचे चित्ता ॥
बाबांनीं हळूच आरंभिली कथा । बाईची व्यथानिवारक ॥ ११२ ॥
तेव्हां नित्यक्रमानुसार । बाबा अपुलीच व्यथा सविस्तर ॥
निवेदूं लागले प्रेमपुरःसर । तत्रस्थ एक्या तिसऱ्यास ॥ ११३ ॥
पाहू जातां बाईची कथा । बाईस सांगावयाची असतां ॥
तिच्यासमक्ष तिसऱ्यास कथितां । परिसिली अतिसावधानता बाईनें ॥
" माझे हात पोट कंबर । बहुत दिवस दुखें अनिवार ॥ "
" औषधें करितां झालों बेजार । होईना परिहार व्यथेचा ॥ ११५ ॥"

" कंटाळलों मीं औषधें खातां । मूण म्हणून येइना तत्वता ॥ "
"परी मज आश्चर्य वाटे आतां । गेली कीं व्यथा एकाएकीं"॥११६॥
ऐसी ही कथा तिजिया कथितां । बाईचा नामनिर्देशही न करितां ॥
तियेचीच ही वार्ता सर्वथा । संबंध हा होता तियेचा ॥ ११७ ॥
पुढें मासा दोमासां अंती । बाबांनीं आपुली जी वर्णिली होती ॥
त्याच तियेच्या व्यथेची निवृत्ति। झाली तंव मती ती पटली तिला११८
पूर्ण झाली बाईची कामना । तंव सपटणेकर घेती दर्शना ॥
त्यांची पूर्वील "चलहट्ट" संभावना । बाबांनीं पुन्हां केलीच ॥११९॥
नकळे काय माझी चूक । धिक्कारिती मज बाबा अचूक ॥
नमस्कारितां उत्तर एक । मजला ठराविक तयांचें ॥ १२० ॥
कायकी माझे पूर्वार्जित । मजवरीच कां रागेजत ॥
इतरां पाशीं माझिया देखत । वर्तत अत्यंत प्रेमानें ॥ १२१ ॥
पाहूं जातां सांजसकाळीं । बाबांपाशीं अवघी मंडळी ॥
आनंदे अनुभवीत नित्य दिवाळी । माझेच कपाळीं 'चलहट्ट'॥१२२॥
कांहीं माझें कर्म विकोपा । गेलें पावलों धर्म विलोपा ॥
आश्रय झालों अनंत पापा । तेणेंच ही अवकृपा मजवरी ॥ १२३ ॥
आरंभीं मी बाबा विषयीं । होतों कुतर्की तैसाच संशयी ॥
तेणेंच वाटलें ऐसिया उपायीं । बाबाच मजठायीं पाडीत ॥ १२४ ॥
म्हणूनि केला निजनिर्धार । अनुग्रह बाबांचा होयतोंवर ॥
तेथेंच वृत्ति ठेवून स्थिर । रहावें सुस्थिर मानसें ॥ १२५ ॥
त्रिविधतापें तापलेला । वरी साईच्या दर्शना भुकेला ॥
ऐसा कोण विन्मुख गेला । जो न निवाला अंतरीं ॥ १२६ ॥
तरी ते दिवसीं अति उद्विग्न । गोड न लागे अन्नपान ॥
गोड न लागे गमना गमन । उन्निद्र नयन शेजेवर ॥ १२७